# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com

जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार , दि. २७ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३५ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१९६८ : अंतराळवीर युरी गागारीन यांचा स्मृतिदिन.
१६६७ : शिवाजी महाराज यांची साथ सोडून मोगलांना जावून मिळालेले नेताजी पालकर यांचे सक्तीने धर्मांतर केले गेले.
१९९३ : सुप्रसिद्ध लेखक मधुकर केचे यांचे निधन झाले.
१९३३ : अंतराळ संशोधक वसंतराव गोवारीकर यांचा जन्म

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७४,५३२.९६ | +३२५.७२ (०.४४%) |
| डॉलर | ₹ ९४.०१ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३७ | १८ |
| दिल्ली | ३० | १८ |
| मुंबई | ३७ | २४ |
| नागपूर | ३५ | १९ |
| पुणे | ३८ | १६ |

### सुविचार

जो झाडावर चढून जातो त्याला फळ खाण्याचा अधिकार आहे.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:२९ संध्या-६:४०

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५१,६९५/- २,४५,०००/-

### थोडक्यात



#### आदित्य ठाकरेंनी संजय राऊतांची कॉलर पकडली?

**मुंबई ।** शिवसेनेच्या दोन्ही गटांतील वाक्युद्ध आता टोकाला पोहोचले असून, शिंदे गटाच्या नेत्या शितल म्हात्रे यांनी ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्याबाबत एक खळबळजनक दावा केला आहे. गेल्या आठवड्यात आदित्य ठाकरे यांनी संजय राऊत यांची कॉलर पकडल्याची चर्चा असल्याचे म्हात्रे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

#### महादेव ॲप प्रकरणी ईडीची दुबईमध्ये कारवाई

**दिल्ली ।** महादेव ऑनलाइन सट्टेबाजी ॲप प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई करत सुमारे १७०० कोटी रुपयांच्या २० स्थावर मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त केल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांपैकी १८ मालमत्ता संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधील दुबई येथे आहेत.

# महिला, बालकांच्या पोषणात सुधारणा करण्याचे लक्ष्य

## महिला बालविकास अन् चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील कुपोषणावर प्रभावी नियंत्रण मिळवून महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात पाच वर्षांचा सामंजस्य करार करण्यात आला असून, या भागीदारीमुळे मातृ व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.**



महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये सघन अंमलबजावणी करण्यात येणार असून राज्यस्तरावरही तांत्रिक सहाय्य दिले जाणार आहे.

तसेच, कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १,००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे.

पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक सहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाईम निरीक्षण, डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मॉनिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे.

या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होऊन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार आहे.

- **महाराष्ट्रात कुपोषणाचा प्रश्न अद्यापही गंभीर स्वरूपात कायम असून, विशेषतः आदिवासी व दुर्गम भागातील जिल्ह्यांमध्ये याचे प्रमाण अधिक असल्याचे विविध अहवालांतून स्पष्ट झाले आहे. विदर्भातील अमरावती, मेलघाट, तसेच यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या जिल्ह्यांत कुपोषणाची समस्या अधिक तीव्र आहे.उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, नाशिकच्या आदिवासी पट्ट्यात तसेच जळगाव जिल्ह्यातील काही भागांतही कुपोषित बालकांची संख्या लक्षणीय आहे. कोकण विभागातील पालघर, ठाणे व रायगड या जिल्ह्यांतही कुपोषणाचा प्रभाव दिसून येतो. याशिवाय मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, बीड व परभणी या जिल्ह्यांतही ही समस्या चिंताजनक आहे. राज्यात सुमारे लाखो बालके कुपोषणाच्या विळख्यात अडकली असून, त्यातील अनेक गंभीर कुपोषणाच्या श्रेणीत येतात. यावर कायमसस्वरुपी उपाय योजनेसाठी राज्य शासनाने हा सामंजस्य करार केला आहे. यातून कुपोषण मुक्ती शक्य होईल, असा विश्वास आहे.**

### ➢ कुपोषण नियंत्रणावर प्रभावी भर


**महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यासाठी या करारांतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे. राजज्यातील एकही जिल्हा कुपोषणग्रस्त राहू नये, यासाठीच हा करार करण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगीतले.**

## भोंदू खरातच्या संपर्कात आमदाराची बायको? राज्यात उडाली खळबळ

प्रतिनिधी। मुंबई

**भोंदूबाबा अशोक खरातच्या विशेष भक्त परिवारात चक्क एका विद्यमान आमदाराच्या पत्नीचा समावेश असल्याची जोरदार चर्चा सध्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात रंगली आहे.**

या उघडकीस आलेल्या माहितीमुळे संपूर्ण प्रकरण अधिक संवेदनशील आणि गुंतागुंतीचे बनले आहे. एकीकडे लैंगिक शोषण, अंधश्रद्धा पसरवणे आणि आर्थिक फसवणुकीसारखे गंभीर गुन्हेगारी आरोप, तर दुसरीकडे प्रभावशाली राजकीय व्यक्तींचा या प्रकरणाशी संबंध, यामुळे पोलिस आणि तपास यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशोक खरात यांच्यावर लैंगिक शोषण,



अंधश्रद्धा पसरवणे, आर्थिक फसवणूक आणि इतर गंभीर स्वरूपाचे आरोप आहेत. या प्रकरणाचा

(पान २ वर)

## रस्ते अपघातग्रस्तांसाठी जीवनदायी असलेली ‘पीएम-राहत’ योजना प्रभावीपणे राबवा

प्रतिनिधी । मुंबई

**रस्ते अपघातात जखमींना तातडीने दीड (१.५०) लाख रुपयापर्यंतचे उपचार पूर्णतः निशुल्क उपलब्ध करून देण्याच्या ‘पीएम-राहत’ योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य आरोग्य हमी सोसायटीची भूमिका महत्वाची आहे. असे आवाहन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात आयोजित जनआरोग्य योजनेच्या बैठकीत केले.**


केंद्र शासनाच्या सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने रस्ते अपघातातील जखमींना तातडीने उपचार मिळावेत यासाठी ‘प्रधानमंत्री रस्ता अपघातग्रस्त रुग्णालयीन उपचार आणि हमी उपचार (पीएम राहत) योजना’ आणली आहे. या योजने अंतर्गत ‘आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना’ व ‘महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना’ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या राज्यातील कोणत्याही



रुग्णालयात दाखल झालेल्या अपघातग्रस्तांना तातडीने ७ दिवसांपर्यंत दीड (१.५०) लाख रुपयांपर्यंतचे उपचार पूर्णतः निशुल्क (रोखरहित) देण्यात येणार आहेत. अनेकदा अपघात झाल्यावर आर्थिक अडचणींमुळे उपचारास विलंब

(पान २ वर)

## केंद्राची वाटपास मंजुरी.! शिधापत्रिकाधारक कुटुंबास मिळणार ३ लिटर केरोसीन



### श्वेतपत्रिकाधारकासही मिळेल केरोसीन

पहिल्या पंधरवड्यात एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन राज्य सरकारकडून एलपीजी तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्या शिधापत्रिका असणाऱ्या कुटुंबास ३ लिटर तर, ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही असे कुटुंब देखील केरोसीन उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहणार आहेत. तसेच, श्वेतपत्रिकाधारक देखील केरोसीन मिळण्यास पात्र असतील, अशी माहिती आहे.

वृत्तसंस्था । मुंबई

**आखाती देशातील संघर्षामुळे सर्वसामान्य नागरिक गॅसटंचाईमुळे त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले असून, केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपास राज्याला मंजुरी देण्यात आलेली आहे.**

राज्यातील प्रति कुटुंब किंवा शिधापत्रिका असलेल्यांना एका शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. एलपीजी तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर तात्पुरत्या स्वरुपात केरोसीन वाटप केले जाणार असल्याची माहिती आहे. जिल्हानिहाय आवश्यक केरोसीन वितरण निश्चित केले असून मार्च-एप्रिलमध्ये राज्यात तिन्ही सरकारी तेल कंपन्यांकडून केरोसीन वाटप होणार आहे.

## आयपीएलच्या पत्रकार परिषदेत डेव्हिड वॉर्नर संतापला

वृत्तसंस्था । मुंबई

मुंबई : आयपीएल २०२६ स्पर्धा येत्या २८ मार्चपासून सुरू होणार आहे. २५ मार्चला सर्व कर्णधारांच्या उपस्थितीत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेचे आयोजन लाहोरच्या गद्दाफी स्टेडियममध्ये करण्यात आले होते. ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज डेव्हिड वॉर्नर हा या स्पर्धेत कराची किंग्ज संघाचं नेतृत्व करत आहे. दरम्यान पत्रकार परिषद सुरू असताना डेव्हिड वॉर्नर इतर खेळाडूंवर संतापला

## आता पेट्रोल पंपांवरही मिळणार दारू

### चंदीगड शासनाची नव्या अबकारी धोरणाला मंजुरी

वृत्तसंस्था । चंदीगड

**चंदीगड प्रशासनाने नव्या अबकारी धोरणाला मंजुरी दिली असून आता पेट्रोल पंपांवरही दारू विक्रीला परवानगी देण्यात आली आहे. नवीन धोरणानुसार दारू विक्री केवळ पारंपरिक दुकानांपुरती मर्यादित राहणार नसून शॉपिंग मॉल, स्थानिक बाजारपेठा आणि निवडक व्यावसायिक ठिकाणीही विक्री करता येणार आहे.**



नव्या धोरणानुसार या ठिकाणी दारू विक्रीस पेट्रोल पंप, शॉपिंग मॉल, स्थानिक बाजारपेठा, मोठी डिपार्टमेंटल स्टोअर्स

प्रशासनाने दारू विक्री अधिक पारदर्शक आणि नियंत्रित ठेवण्यासाठी काही कठोर नियम लागू केले आहेत. प्रत्येक दारू दुकानात डिजिटल पेमेंट बंधनकारक असून बार, हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये अल्कोहोल मीटर बसवणे आवश्यक आहे. दारू वाहतूक करणाऱ्या वाहनांना ट्रॅकिंग अनिवार्य असेल. सर्व विक्री केंद्रांवर आणि लाईव्ह मॉनिटरिंग असणार आहे. बोटलिंग प्लांट आठवड्यात ६ दिवस सुरू ठेवण्याची परवानगी. प्रशासनाच्या मते, हे नियम जबाबदार मद्यपानाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी लागू करण्यात आले आहेत.

(पान २ वर)

## व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

### राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार वितरणप्रसंगी विधानसभाध्यक्ष ॲड. नार्वेकर

वृत्तसंस्था । मुंबई

**व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी शासनाबरोबरच प्रत्येक नागरिक, संस्था आणि समाजघटकांनी जबाबदारी स्वीकारून एकत्रित प्रयत्न करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केले.**




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे सन २०२० ते २०२५ या पाच वर्षातील राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार वितरण सोहळा झाला. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर बोलत होते. कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे तसेच विभागाच्या आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, कीर्तनकार सत्यपाल महाराज उपस्थित होते.

विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर म्हणाले की, समाजात परिवर्तन घडविण्याचे काम सामाजिक न्याय विभाग प्रभावीपणे करत असून, लोकोपयोगी उपक्रमांमुळे सकारात्मक संदेश समाजात पोहोचत आहे. या सोहळ्यात १०० हून अधिक व्यक्ती आणि १३ संस्थांचा

### व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संकल्प


**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली व्यसनमुक्त व गरीबीमुक्त समाज घडविण्याचा संकल्प आहे. व्यसनामुळे कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि तरुण पिढीवर त्याचे गंभीर परिणाम होतात. ड्रग्जच्या विळख्यात तरुण पिढी अडकू नये यासाठी कठोर पावले उचलली जात आहेत. व्यसनमुक्ती हीच प्रगतीची दिशा आहे, असा संदेश देत नागरिकांना व्यसनमुक्त जीवन जगण्याचे आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.**

## इराण युद्धाचे सावट : पंतप्रधान मोदींची सर्व मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक

प्रतिनिधी । नवी दिल्ली

**पश्चिम आशियातील लांबलेले युद्ध आणि त्याचे भारतावर होणारे परिणाम या विषयावर चर्चा करण्यासाठी पंतप्रधान मोदी शनिवारी (दि. २७ मार्च) सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार आहेत.**

ज्या राज्यांना एलपीजी गॅसचा तुटवडा अधिक भासत आहे, त्या राज्यांशीही पंतप्रधान मोदी संवाद साधतील. मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर या



बैठकीत पुरवठा साखळी, ऊर्जा उत्पादनांची सुरक्षा आणि विदेशात असलेल्या भारतीय नागरिकांची सुरक्षितता या विषयावर चर्चा केली जाणार आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिती आव्हानात्मक असताना भारतातील सर्व राज्य आणि केंद्र यांच्यात योग्य

## संपादकीय

### अफवांचे वाढले युद्ध !

इराणविरुद्ध अमेरिका आणि इस्रायल या लष्करी संघर्षाला आता एक महिना पूर्ण होत आला आहे. या तीन देशांचा सहभाग असलेले युद्ध प्रामुख्याने इराण, इस्रायलच्या भूमीवर आणि आखातातील काही देशांच्या भूमीवर लढले जात असले तरी त्याच ताकदीचे दुसरे एक युद्ध अफवांच्या माध्यमातून लढवले जात आहे. या महिन्याभराच्या कालावधीमध्ये युद्धाच्या बातम्यांमुळे माध्यमांना ब्रेकिंग न्यूजचा मोठा मसाला मिळाला. यानिमित्ताने खरे किंवा खोटी याची फारशी खात्री न करतासुद्धा बातम्या पुढे येत गेल्या. सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्म्सने तर या निमित्ताने संधीच साधली आणि अफवांचा अक्षरशः बाजारच मांडला. इस्रायलचे सर्वेसर्वा बेंजामिन नेतान्याहू यांचा मृत्यू झाल्याची अफवा असो किंवा इराणचे नवे प्रमुख मोजतबा यांचासुद्धा हल्ल्यामध्ये मृत्यू झाल्याची बातमी असो किंवा तेलाच्या जहाजांचा प्रवास यावरून निर्माण झालेल्या विविध अफवा असो, माध्यमांनी अशा प्रकारच्या चुकीच्या बातम्यांना प्राधान्य देऊन समाजमन अस्वस्थ करण्याचेच काम केले. या युद्धाचा सर्वात मोठा परिणाम अप्रत्यक्षपणे सर्व जगावर झाला तो म्हणजे इंधनाचा विस्कळीत पुरवठा. साहजिकच भारतासह सर्वच देशांना इंधनाचा तुटवडा जाणवणार हे गृहीत होते. अर्थात, गेल्या महिन्याभराच्या कालावधीमध्ये अजूनही भारतात फारशी बिकट परिस्थिती निर्माण झालेली नाही. पेट्रोल आणि डीझेलचे भावही वाढवण्यात आले नाहीत. फक्त प्रीमियम पेट्रोलच्या दरामध्ये काही प्रमाणात वाढ करण्यात आली आहे. पण समाज माध्यमांनी पेट्रोल, डीझेलचेही दर अफवांच्या माध्यमातून अजून वाढवून ठेवले होते. त्यातच आता पेट्रोल आणि डीझेल संपल्याच्या अफवा पसरू लागल्याने पेट्रोल पंपांवरच्या रांगाही वाढू लागल्या आहेत. खरेतर गेल्या महिन्याभराच्या कालावधीमध्ये पेट्रोल आणि डीझेल या इंधनाच्या पुरवठ्यावर आणि त्याच्या विक्रीवर कोणताही परिणाम झाला नव्हता. एखाद्याच पेट्रोल पंपावर इंधन संपल्यामुळे पेट्रोल पंप बंद ठेवण्यात आला असावा. पण गेल्या दोन दिवसांच्या कालावधीमध्ये आता पेट्रोलची प्रचंड टंचाई अशा प्रकारच्या अफवाही पसरू लागल्या आहेत. अशा युद्धाच्या परिस्थितीमध्ये भविष्यकाळात काहीही होऊ शकते या भीतीने सर्वसामान्य नागरिक नेहमीच साठवणूक करण्याच्या मानसिकतेत असतोच. त्यातूनच स्वयंपाकाचा गॅस असो अथवा पेट्रोल डीझेल असो त्याची साठवणूक करण्याकडे लोकांचा कल वाढला होता. नेहमीच्या सर्वसाधारण मागणीपेक्षा अनेकपट मागणी या कालावधीमध्ये वाढली होती. त्याचा परिणाम थेटपणे इंधन पुरवठा साखळीवर होणे गृहीतच होते. अनेक वेळा साठेबाज अशा परिस्थितीचा फायदा करून घेऊन नफा मिळवण्यासाठी जाणीवपूर्वक टंचाईच्या अफवा पसरवतात आणि काळा बाजारांमध्ये इंधन भरमसाठ दराने विकतात असेही अनुभव यापूर्वी आले आहेत. साहजिकच अफवांच्या या बाजारामध्ये नक्की कोणाचा फायदा होत आहे हे सर्वसामान्य नागरिकांनीसुद्धा लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अर्थात, सरकारनेसुद्धा आपली जबाबदारी टाळता कामा नये. इंधनपुरवठ्याबाबत आणि इंधनाच्या उपलब्धतेबाबत जे काही तथ्य आहे ते दररोज नागरिकांच्या समोर येणे अत्यंत आवश्यक आहे. कोविड महामारीच्या कालावधीमध्ये दररोज दुपारी तीन वाजता केंद्रातील आरोग्य विभागाचे अधिकारी पत्रकार परिषद घेऊन देशातील महामारीची परिस्थिती काय आहे याबाबत निवेदन करत असत. त्यामुळे त्या काळामध्ये अफवांवर बऱ्यापैकी नियंत्रण बसले होते. आता या युद्ध परिस्थितीमध्ये सुद्धा भारतापुरता विचार करायचा झाल्यास केंद्रातील अधिकाऱ्यांनी दररोज योग्य प्रकारचे निवेदन करून वस्तुस्थिती देशासमोर मांडायला हवी. केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे हे काम आहे असे नाही तर राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही विशेषतः सत्ताधारी नेत्यांनी आपापल्या भागातील मतदारांपर्यंत वास्तव परिस्थिती पोहोचवणे आवश्यक आहे.

# भोजन बिलांमध्ये अपहार; सहाय्यक प्रकल्प अधिकारी रडारवर

## संभाजीनगर पोलिसांनी तळोदा प्रकल्प कार्यालयातून उत्तम राऊतला घेतले ताब्यात

प्रतिनिधी । तळोदा

**तळोदा येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी उत्तम नागोजी राऊत यांना आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपाखाली संभाजीनगर पोलिसांनी काल सकाळी कार्यालयातूनच ताब्यात घेतले. या नाट्यमय कारवाईमुळे प्रकल्प कार्यालयात आणि परिसरात एकच खळबळ उडाली आहे. शासकीय वसतिगृहातील भोजन बिलांमध्ये लाखो रुपयांचा अपहार केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.**

याबाबत मिळालेल्या माहिती अशी की, हा सर्व गैरप्रकार संभाजीनगर येथील आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालवल्या जाणाऱ्या शासकीय वसतिगृहामध्ये घडला आहे. सन २०१६ ते २०२० या कालावधीत उत्तम राऊत आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी संगनमताने विद्यार्थ्यांची खोटी हजेरी पत्रके तयार केली. प्रत्यक्षात असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कागदोपत्री विद्यार्थ्यांची संख्या पुगवून दाखवण्यात आली. या वाढीव संख्येच्या आधारे भोजन पुरवठ्याची बनावट देयके (बिले) तयार करून शासनाकडून सुमारे २० ते २५ लाख रुपयांचा निधी हडप केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. या प्रकरणाची उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सखोल चौकशी करण्यात आली होती. चौकशीत अनियमितता स्पष्ट झाल्यानंतर संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यासाठी आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र, आयुक्तालयाकडून दीर्घकाळ कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. अखेर संभाजीनगर येथील पुंडलिक नगर पोलिसांनी स्वतःहून पुढाकार घेत याप्रकरणी गुन्हा नोंदवला आणि संशयितावर अटकेची कारवाई केली. उत्तम राऊत यांची काही काळापूर्वीच तळोदा येथे बदली झाली होती. मात्र, संभाजीनगर येथील त्यांच्या कार्यकाळातील भ्रष्टाचाराची पाळेमुळे आता समोर आली आहेत. पोलिसांच्या एका पथकाने मंगळवारी सकाळी थेट तळोदा प्रकल्प कार्यालय गाठून त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणात उत्तम नागोजी राऊत तत्कालीन (गृहप्रमुख सध्या कार्यरत तळोदा प्रकल्प कार्यालय) दिलीप नारायण खोकले (तत्कालीन सहाय्यक प्रकल्प अधिकारी), सुरेंद्र अंबादास कावरे, बळीराम भिवाजी गडमे, श्याम बबनराव देशमुख यांच्यासह




- खोटी हजेरी पत्रके केली तयार
- विद्यार्थ्यांपेक्षा कागदोपत्री संख्या अधिक
- भोजन पुरवठ्याची वाढीव बनावट देयके
- २० ते २५ लाख रुपयांचा निधी हडप
- प्राथमिक चौकशीत अनियमितता स्पष्ट
- संभाजीनगर येथील पुंडलिक नगर पोलिसांनी पुढाकार घेत नोंदवला गुन्हा

इतरांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४०९, ४६८, ४७१, १२०, (ब) आणि ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी उत्तम राऊत यांना पोलिस उपनिरीक्षक विनोद भालेराव, पोलिस अंमलदार अंकुश वाघ यांनी त्यांना ताब्यात घेतले असून या प्रकरणातील पुढील आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. दरम्यान राऊत याला न्यायालयात हजर केले असता दि. २७ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत सुनावण्यात आली आहे.

**छत्रपती संभाजी नगर येथून आलेल्या पोलिसांनी उत्तम राऊत यांच्यावर दाखल असलेल्या मागील गुन्ह्याची माहिती दिली व त्यासाठी त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास त्यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.**

**अनय नावंदर,**
प्रकल्पाधिकारी, तळोदा

----------------

**वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या नावे बनावट बिले काढून शासनाची फसवणूक करणे हा गंभीर गुन्हा आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि प्राथमिक चौकशीतील पुराव्यांच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. यातील इतर संशयितांचाही शोध घेतला जात आहे.**

**विनोद भालेराव,**
पोलीस उपनिरीक्षक, पुंडलिकनगर पोलीस स्टेशन, संभाजीनगर

# नवापूर येथे महावितरण-नगरपालिका कर्मचाऱ्यात रंगला कलगीतुरा

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूर येथील महावितरण-नगरपालिका कर्मचाऱ्यांत चांगलाच कलगीतुरा रंगला. पालिकेकडे महावितरणचे ६० लाख वीज बिल थकीत असल्याने त्यांनी मुख्य पाणीपुरवठा केंद्र, जलशुद्धीकरण केंद्राचा वीजपुरवठा खंडित केला. तर महावितरणकडेदेखील मालमत्ता कर थकीत असल्याने नगरपालिकेने महावितरणच्या मुख्य कार्यालयाला टाळे ठोकले. त्यामुळे काही काळ वातावरण तापले होते. परंतु नगरपालिकेने ४० लाख बिल भरले व महावितरणने ४६ हजाराची थकीत रक्कम भरल्याने वादावर पडदा पडला.**



महावितरण कार्यालयामार्फत नवापूर नगर परिषदेकडे शहरातील बोअरिंग, तसेच पथदिव्यांचे जानेवारी २०२५ पासून जवळपास ६० लाख बाकी होते. त्या अनुषंगाने महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी आज नवापूर नगरपरिषद कार्यालय तसेच शहराला पाणीपुरवठा करणारे मुख्य पाणीपुरवठा केंद्र, जलशुद्धीकरण केंद्र यांचा वीज पुरवठा खंडित केला. त्यातील मुख्य पाणी पुरवठा केंद्राचे बिल हे ७० हजार चालू महिन्याचे असले तरी देखील महावितरणने आडमुठे धोरण घेत शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनीची वीज तोडणी करत नगरपालिकेचे नाक दाबण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी नगरपरिषदने देखील वीज वितरण कंपनीचे उपकेंद्र तसेच कार्यालयीन मालमत्ताकर थकीत असल्याने वीज वितरण कंपनीचे मुख्य कार्यालय मुख्याधिकारी डॉ.मयूर पाटील यांच्या प्रमुख उपस्थित बांधकाम अभियंता विवेक भामरे, कर निरीक्षक स्वप्नील मिसर, कर निरीक्षक विशाल पाटील, पाणीपुरवठा अभियंता प्रसाद सानप यांनी महावितरणचे मुख्य कार्यालयाला टाळे ठोकले. वीज वितरण विभागाच्या मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात उपकार्यकारी अभियंता शेख व मुख्याधिकारी डॉ.मयूर पाटील यांच्यात काही काळ वातावरण तापले होते. हा सर्व प्रकार दोन तास सुरु असताना नगराध्यक्ष जयवंत जाधव, पाणीपुरवठा सभापती शरद पाटील, फारुक शहा तसेच वीज वितरण चे अधिक्षक अभियंता सावस धाराडे यांनी मध्यस्ती करत नगरपरिषद ने ४० लक्ष बील अदा केले तर वीज वितरण विभागाणे नगरपरिषदेचा धक्कीत भरणा ४६ हजार भरणा करत या प्रकरणावर पडदा टाकला.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत तरुणाचा सन्मान

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील नवोदित मल्ल हिमेश गर्दे याने कुस्ती क्षेत्रात वेगळा ठसा उमटविला आहे. पारंपरिक लाल मातीतील कुस्तीबरोबरच डिजिटल माध्यमाचा प्रभावी वापर करत त्याने आपली ओळख निर्माण केली आहे.**

चितोड रोडवरील कैलासनगर येथील हिमेशने दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र कुस्ती दंगल हे इंस्टाग्राम पेज सुरू केले. राज्यासह देशभरातील कुस्ती दंगली, स्पर्धा आणि खेळाडूंबाबत नियमित माहिती देण्यास सुरुवात केली. आकर्षक मांडणी आणि वास्तवदर्शी सादरीकरणामुळे पेज अल्पावधीत लोकप्रिय झाले. लाखो प्रेक्षक या माध्यमाशी जोडले गेले. वाघोली (पुणे) येथे अलीकडे झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत हिमेशला महत्त्वाची संधी मिळाली. स्पर्धेचे आयोजक रामकृष्ण सातव-पाटील यांनी महाराष्ट्र कुस्ती दंगल पेजची दखल घेत थेट प्रक्षेपणाची जबाबदारी सोपविली. हिमेशने ही जबाबदारी समर्थपणे पार पाडली. स्पर्धेचे थेट प्रक्षेपण लाखो प्रेक्षकांपर्यंत पोहोचले. उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत आयोजकांकडून हिमेशचा चांदीची गदा देऊन सन्मान करण्यात आला.

## पान १ वरुन

### भोंदू खरातच्या संपर्कात......

सखोल तपास करणाऱ्या यंत्रणांना आता काही महत्त्वाचे धागेदोरे हाती लागले आहेत. चौकशीदरम्यान खरातच्या जवळच्या विशेष भक्त वर्तुळात एका विद्यमान आमदाराच्या पत्नीचे नाव स्पष्टपणे समोर आले आहे. ही महिला कोण आहे, तिने खरातशी नेमकी काय भूमिका बजावली होती आणि तिचा या प्रकरणातील सहभाग कितपत आहे, याचा सखोल तपास सध्या सुरू आहे.

### आता पेट्रोल पंपांवरही ....

चंदीगडमध्ये एकूण ९७ दारू दुकानांना मान्यता दिली आहे. भारतीय मद्य, बिअर आणि वाईनच्या किमतीत कमाल २% दरवाढ होण्याची शक्यता आहे.प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, नव्या अबकारी धोरणाचा उद्देश फक्त दारू सहज उपलब्ध करून देणे नाही, तर संपूर्ण विक्री प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि अवैध दारू विक्रीवर नियंत्रण ठेवणे हा आहे.नियंत्रित विक्री, डिजिटल व्यवहार आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे महसूल वाढीसोबतच नियमांचे पालन अधिक प्रभावी होईल, असा प्रशासनाचा दावा आहे.प्रशासनाने दारू विक्री अधिक पारदर्शक आणि नियंत्रित ठेवण्यासाठी काही कठोर नियम लागू केले आहेत. प्रत्येक दारू दुकानात डिजिटल पेमेंट बंधनकारक असून बार, हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये अल्कोहोल मीटर बसवणे आवश्यक आहे.

### रस्ते अपघातग्रस्तांसाठी......

होतो. वेळेत उपचार मिळत नाहीत. पीएम-राहत' योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास अपघाती मृत्यूचे प्रमाण कमी होईल, असा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

पीएम -राहत योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत राज्य आरोग्य सोसायटीच्या प्रशासनाची भुमिका महत्वाची असुन, रूग्णाला तातडीने उपचार मिळावेत यासाठी अंगीकृत रुग्णालयात दाखल करणे. पोलिसांकडून अपघाताची खात्री करून उपचारांना मान्यता देणे, -योजनेअंतर्गत उपचारास मंजूरी देणे व मंजूर दावे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सादर करण्याची आरोग्य सोसायटीची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात (पीएम -राहत ) योजना राबवण्यासाठी परिवहन विभागाच्या अखत्यारीतील

राज्य रस्ते सुरक्षा परिषद ही नोडल एजन्सी नियुक्त करण्यात आली असुन, योजनेची अंतिम देयके परिवहन विभागामार्फत दिली जातात.

### व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी......

गौरव होत असून, हे कार्य राष्ट्रनिर्मितीला बळ देणारे आहे, असे त्यांनी नमूद केले. व्यसन ही केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक आणि राष्ट्रीय समस्या आहे. व्यसनामुळे आर्थिक नुकसान, उत्पादकतेत घट, आरोग्य व्यवस्थेवर ताण, गुन्हेगारीत वाढ, कुटुंबव्यवस्थेचे विघटन आणि शिक्षणातील गळती वाढते, असेही त्यांनी सांगितले.

भारत हा जगातील सर्वात तरुण देश असून २०२७ पर्यंत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे ध्येय आहे. या पार्श्वभूमीवर युवाशक्तीचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचाराप्रमाणे समाजात बदल घडवायचा असेल तर प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करावी, असे आवाहन त्यांनी केले. समाजातील वाईट प्रवृत्तीविरुद्ध शांत न राहता सक्रिय भूमिका घेण्याची गरज आहे. समाजाला व्यसनमुक्त करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून पुढील काळात अधिक व्यापक उपक्रम राबविले जातील, असा विश्वास विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर यावेळी व्यक्त केला.

### इराण युद्धाचे सावट ......

समन्वय राखून टीम इंडिया या भावनेला अधिक महत्त्व देण्यासाठी पंतप्रधान मोदी सदर बैठक घेत आहेत, अशी माहिती मिळत आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळात आपत्कालीन परिस्थिती आणि अंतर्गत सुरक्षा अबाधित राखण्याच्या विषयावरही यावेळी चर्चा होऊ शकते.

# समाजाच्या कुलदेवतांसाठी सुसज्ज पाटीदार धाम उभारणार : अभिजीत पाटील

प्रतिनिधी । शहादा

**समाजासाठी प्रत्येक पिढीने आपापल्या परीने योगदान दिले आहे. समाजाचे असंख्य विषय आहेत, ते सोडविण्यासाठी राजकीय रंग बाजूला ठेवून सर्वांनी एकत्रित आले पाहिजे. समाज बांधवांनी केलेल्या मागणीनुसार येत्या काळात लवकरच समाज बांधवांचा मदतीने शहरात पाटीदार भवन कार्यालय, सरदार वल्लभभाई पटेल यांचे भव्य स्मारक, समाजाच्या कुलदेवतांसाठी सुसज्ज पाटीदार कुलदैवत धाम उभारण्यात येईल असे आश्वासन शहाद्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत दादा पाटील यांनी दिले.**



लेवा पाटीदार उन्नती मंडळाने नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांची त्यांच्या मोहिदा रस्त्यावरील कार्यालयात भेट घेऊन लेवा पाटीदार समाजापुढील अडचणी, विविध लक्षात ठेवली पाहिजे असेही श्री. पाटील यांनी सांगितले. प्रश्नांबाबत पुढाकार घेऊन चालना देण्यासाठी निवेदन देण्यात आले. त्यावेळी समाजकार्यात राजकारण नको. ज्या लोकांना समाजहिताचे काम करायचे असेल त्यांना ते करू द्यावे. मतभेद करू नये. ग्रामीण व शहरातील नागरिकांनी समाज उन्नतीसाठी एकत्रित यावे. सर्व समाज बांधवांनी एकत्रित प्रगत सुसंस्कृत समाज घडवण्यासाठी प्रयत्न करू. आपल्यामुळे समाज नसून समाजामुळे आपण आहोत ही भावना प्रत्येकाने ठेवली पाहिजे,असे श्री. पाटील यांनी सांगितले.

यावेळी लोकेश पाटील, हर्षल पाटील, मनोज चौधरी, हितेंद्र पाटील, महेंद्र पाटील, मुकेश पाटील आदींसह अन्य समाज बांधवांनी मनोगतातून समाजासमोरील येणाऱ्या विविध अडचणी, प्रश्न व समस्या मांडत त्या सोडवण्यासाठी नगराध्यक्ष श्री. पाटील यांना आवाहन केले.

# सप्तशृंगी मातेच्या यात्रोत्सवानिमित्त धुळे आगारातून जादा बसेस

## प्रवाश्यांच्या सेवेसाठी दर तासाला एसटी बस सोडणार; ३५ ते ४० पर्यवेक्षकीय अधिकारी नियुक्ती

प्रतिनिधी । धुळे

**उत्तर महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या आद्यस्वयंभू शक्तीपीठ सप्तशृंगी मातेच्या यात्रोत्सवासानिमित्त राज्य परिवहन महामंडळाच्या धुळे विभागातून यंदाही प्रत्येक आगारातून जादा बसेससह दर तासाला एसटी बस प्रवाश्यांच्या सेवेसाठी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**

नाशिक जिल्ह्यातील वणी येथील साप्तशृंगी देवीची चैत्र महिन्यात यात्रा भरत असते. यावर्षी यात्रोत्सवास दि. २६ मार्चपासून सुरूवात होत आहे. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून सप्तशृंगी गड येथे देवीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक हे पायी तर काही भाविक एसटी महामंडळाच्या बसेसने जात असतात. या पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळाच्या धुळे विभागातील धुळे, साक्री, शिरपूर, शिंदखेडा, दोंडाईचा, नंदुरबार, शहादा, अक्कलकुवा व नवापूर आगारांमधून जादा बसेससह भाविकांची संख्या लक्षात घेता दर तासाला सप्तशृंगी गडासाठी बसेस सोडण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही भाविकांच्या सेवेसाठी सप्तशृंगी गडावर होणाऱ्या यात्रोत्सवानिमित्त धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील प्रत्येक आगारातून जादा बसेससह दर तासाला बसेसची व्यवस्था एस.टी. महामंडळातर्फे करण्यात आली आहे. भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने एस. टी. महामंडळाच्या बसनेच प्रवास करून रा.प.महामंडळाला सेवेची संधी द्यावी,असे आवाहन धुळे आगारातर्फे केले आहे.

वणी येथील सप्तशृंगी गडावर भाविकांचे दर्शन झाल्यावर परतणाऱ्या धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील भाविकासांठी स्वतंत्र एक तात्पुरत्या बसस्थानकाची सोय करण्यात आलेली आहे. या तात्पुरत्या बसस्थानकावरून धुळे, साक्री, नंदुरबार, शिरपूर, शहादा, शिंदखेडा, अक्कलकुवा, दोंडाईचा व नवापूरसाठी बसेस उपलब्ध होणार असून त्यामुळे भाविकांचा परतीचा प्रवास सोयीस्कर होणार आहे. धुळे विभागातील अधिकारी-कर्मचारी देखील भाविकांच्या मदतीला सप्तशृंगी गडावर यात्रा कालावधीत भाविकांच्या सेवेसाठी व मार्गदर्शनासाठी धुळे विभागातील विविध आगारांचे सुमारे ३५ ते ४० पर्यवेक्षकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हे कर्मचारी दिवसा व रात्र पाळीत २४ तास प्रवाश्यांच्या मदतीसाठी व मार्गदर्शनासाठी उपलब्ध असतील. यांत्रिक कर्मचाऱ्यांचे पथक सप्तशृंगी गडावरील



रस्ता हा घाट स्वरुपाचा असल्याने कदाचित बसेस नादुरुस्त झाल्यास बसेसच्या दुरुस्तीसाठी सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक व हेड मेकॅनिक यांच्या अधीपत्याखाली यांत्रिक कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र पथक ब्रेकडाऊन व्हॅनसह असणार आहे. यामुळे एसटी बसेस लवकर दुरुस्ती होऊन प्रवाशांचा प्रवास सुखकर होण्यास मदत होईल. सप्तशृंगी गडावर दर्शनासाठी चैत्र पौर्णिमेच्या दिवशी जादा बसेसची व्यवस्था होणार असून दि.२ एप्रिल रोजी सकाळी ७.४१ वाजेपर्यंत पौर्णिमा असणार आहे. त्यादृष्टीने जादा बसेसचे नियोजन केले असल्याची माहिती विभागीय वाहतूक अधिकारी उमेश बिरारी यांनी दिली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ **कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# श्रीराम नवमीनिमित्त जळगावात भव्य शोभायात्रा

## मिरवणुकीत १८ मंडळांचा सहभाग; लहान मुलींचे लेझिम पथक ठरले लक्षवेधी

प्रतिनिधी । जळगाव

**सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समिती महानगरतर्फे दि. २६ मार्च रोजी श्रीराम नवमीनिमित्त शहरातील विविध भागातून भव्य शोभयात्रा काढण्यात काढण्यात आली. या मिरवणुकीत १८ मंडळांचा सहभाग होता. तसेच १०० लहान मुलींचे लेझिम पथकाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते.**

सर्वांचे आराध्य दैवत प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सवानिमित्त मुख्य शोभायात्रा दि.२६ रोजी सायंकाळी ५ वाजता दक्षिण मुखी हनुमान गोलाणी मार्केट येथून विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते महाआरतीने प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर गोलाणी मार्केट परिसर, नेहरू चौक, टॉवर चौक, काँग्रेस भवन, दाणा बाजार, सुभाष चौक, सराफ बाजार मार्गे रथ चौक येथील ग्राम दैवत प्रभू श्रीराम मंदिर येथे रात्री समारोप करण्यात आला. रात्री १०:३० वाजता उद्योगपती अशोक जैन यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते महाआरती करीत या शोभायात्रेची सांगता करण्यात आली. या शोभायात्रेत लहान मुलांसह तरुण आणि विविध मंडळाचे पदाधिकारी अत्यंत जल्लोषात आणि उत्साहाने सहभागी होऊन आनंदोत्सव साजरा करीत होते. या शोभायात्रेत १०० लहान मुलींचे लेझिम पथक देखील सहभागी झाले होते. ध्वज संचलन व पालखी, शिव कालीन विविध शस्त्र आखाडा आणि विविध मंडळ, सजीव देखावे, पारंपरिक वाद्य आदींचा सहभाग होता.या मिरवणुकीत छत्रपती बजरंग मित्र मंडळ, शनी पेठ मित्र मंडळ, संकट मोचन मित्र मंडळ, चौका मंडळी, महर्षी वाल्मिक मित्र मंडळ, जय श्रीराम बहुद्देशीय संस्था, शाहू नगर मित्र मंडळ, जय भवानी ग्रुप, शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान, वीर बाजी प्रभू मित्र मंडळ, सनातन संस्था- हिंदू जनजागृती समिती, भगवा चौक मित्र मंडळ, महाबली वाद्य पथक, शिवसूर्य वाद्य पथक, महर्षी वाल्मिक सांस्कृतिक मंडळ, जगदंबा मित्र मंडळ, कांचन नगर आदी मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. दरम्यान, शहरातील चिमुकले राम मंदिर यासह विविध मंदिरांना आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. तसेच फुलांच्या सजावटीने मंदिर परिसर उजळून निघाला होता. पहाटे काकड आरतीने धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. त्यानंतर प्रभू रामरायांचा दुग्ध महाअभिषेक करण्यात आला. दुपारी बारा वाजता राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.





यावेळी कथा वाचन करत दादा महाराज जोशी यांनी प्रभू श्रीरामांच्या जन्मोत्सवाचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाला आमदार सुरेश भोळे महापौर दीपमाला काळे तसेच पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्यासह उपस्थित होते. त्यांच्या हस्ते प्रभू रामरायांची आरती करण्यात आली. यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. जय श्रीरामच्या जयघोषाने संपूर्ण जळगाव शहर दुमदुमून गेले होते.

# थोडक्यात

### महिला सबलीकरणासाठी मोफत स्वसंरक्षण प्रशिक्षण

**जळगाव ।** हिंदु युवती आणि महिला यांचे जीवन सुरक्षित होण्यासाठी आणि समाजातील अनैतिक मानसिकता ठेचण्यासाठी हिंदु जनजागृती समितीच्यावतीने १५ ते ४० या वयोगटातील युवती आणि महिलांसाठी विनामूल्य स्व संरक्षण प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दि. २७ मार्च ते ५ एप्रिलदरम्यान दररोज सायंकाळी ६ वाजता श्रीअष्टभुजा माता मंदिर, पिंप्राळा येथे घेण्यात येणार आहे. यामध्ये ज्युडो कराटे, लाठी काठी, दंड साखळी यांचे प्रशिक्षण देण्यात येईल. रणरागिणी शाखेच्या वतीने कु सायली पाटील यांनी या प्रशिक्षणासाठी जास्तीत जास्त युवती आणि महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### संत ज्ञानेश्वर विद्यालयात अभ्यास मित्र उपक्रम

**जळगाव ।** येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास मित्र या उपक्रमांची सुरुवात करण्याचा ठराव बालसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळणार आहे. बालसभा उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वक्तृत्व, कविता सादरीकरण, नाट्यछटा, सामान्य ज्ञान यांसारख्या विविध कलागुणांना वाव मिळणार आहे. मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी या उपक्रमांचे महत्त्व पटवून देत सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. शिक्षिका रूपाली आव्हाड, पर्यवेक्षिका शितल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

### गोदावरी महाविद्यालयात क्षयरोग दिन जनजागृती

**जळगाव ।** जागतिक क्षयरोग दिननिमित्त गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, जळगावच्या मेडिकल सर्जिकल नर्सिंग विभागामार्फत क्षयरोगाबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आपण क्षयरोग संपवू शकतो: देशांच्या नेतृत्वाखाली, लोकांच्या सामर्थ्याने असा असून, देशांचे नेतृत्व आणि जनसहभाग यांच्या बळावर क्षयरोगाचा अंत शक्य आहे, असा संदेश या थीममधून देण्यात आला आहे.कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलचे रेसिडेंट डॉ. सौरव मुले यांनी क्षयरोग: सद्य आव्हाने आणि निर्मूलनासाठीच्या रणनीती या विषयावर मार्गदर्शन केले. क्षयरोगाची लक्षणे, आधुनिक निदान पद्धती, औषधांचा पूर्ण कोर्स घेण्याचे महत्त्व पटवून दिले.

# जळगाव महामार्ग होणार अतिक्रमणमुक्त

## महामार्गावरील वाहनांना ७ दिवसांचा अल्टिमेटम : महापौर

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहरातून जाणाऱ्या महामार्गावर दुतर्फा लावण्यात आलेल्या वाहनांमुळे होणारी वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी महापौर दीपमाला काळे यांनी कडक पावले उचलली आहेत. महामार्गावरील वाहने हटवण्यासाठी संबंधित वाहनधारकांना ७ दिवसांची मुदत देण्यात आली असून, त्यानंतर थेट जप्तीची कारवाई केली जाणार आहे. खेडी ते खोटे नगरदरम्यानचा महामार्ग पूर्णपणे अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्धार महापौरांनी व्यक्त केला आहे.**



बुधवारी महापौरांच्या उपस्थितीत एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, उपायुक्त धनश्री शिंदे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक पवन देसले, नहीचे अधिकारी राहुल पाटील आणि अतिक्रमण विभागाचे संजय ठाकूर आदी उपस्थित होते. महामार्गाचा काही भाग हा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (नही) हद्दीत असल्याने १ एप्रिलपासून महापालिका, नही आणि वाहतूक पोलीस संयुक्तपणे वाहने हटवण्याची मोहीम राबवणार आहेत. महामार्गालगत भरणारे कार आणि दुचाकींचे बाजार १ एप्रिलपासून पोलीस आणि मनपा प्रशासनाच्या मदतीने हटवले जातील. शहरात पार्किंगची समस्या सोडवण्यासाठी ३० मार्चपासून रस्त्यांवर पिवळे आणि पांढरे पट्टे आखले जाणार असून पार्किंग स्पॉट निश्चित केले जातील. फेरीवाल्यांना रस्त्यावरून हटवून त्यांना मनपाच्या पडीक जागांवर खाऊगल्ली विकसित करून दिली जाणार आहे.

> **कारवाई अटळ**
> नागरिकांनी सात दिवसांच्या आत आपली वाहने महामार्गावरून स्वतःहून काढून घ्यावीत. रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यासाठी सहकार्य करावे, अन्यथा १ एप्रिलपासून जप्तीची कठोर कारवाई अटळ आहे. तसेच शहरातील इतर अतिक्रमण देखील लवकरच पूर्ण उचलण्यासाठी नियोजन करण्यात आलेले आहे. त्यांना पर्यायी जागा ठरवून दिली जाणार आहे.
> **–दीपमाला काळे,** महापौर

### मनसेचे संपर्क अध्यक्ष गजानन राणे २८ रोजी जळगाव दौऱ्यावर

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जळगाव जिल्हा संपर्क अध्यक्ष म्हणून नुकतीच नियुक्ती झाल्यानंतर गजानन राणे हे दि. २८ रोजी जळगाव जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. संपर्क अध्यक्षपद स्वीकारल्यानंतरचा हा त्यांचा पहिलाच अधिकृत दौरा असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या दौऱ्यानिमित्त सकाळी ११ वाजता नेहरू चौक जळगांव येथील पद्मालय विश्रामगृहात जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

बैठकीत जिल्ह्यातील सर्व जिल्हाध्यक्ष, उपजिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, गट अध्यक्ष, अध्यक्ष, विभाग अध्यक्ष, शाखाध्यक्ष, आजी-माजी पदाधिकारी तसेच अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, विद्यार्थी सेना, नवनिर्वाचित सदस्य व महिला सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष मुकुंदा रोटे यांनी केले आहे.

# पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध ; आढावा बैठकीत ठराव

## उपाययोजनाबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या संबंधित विभागांना सूचना



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता राखणे तसेच नागरिकांच्या तक्रारींचे विहित मुदतीत प्रभावी निवारण करणे यासाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली.**

या बैठकीत समितीकडे प्राप्त झालेल्या विविध तक्रारींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रलंबित प्रकरणांची सद्यस्थिती, त्यावर करण्यात आलेली कार्यवाही तसेच पुढील आवश्यक उपाययोजना याबाबत संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

तक्रारींची वस्तुनिष्ठ व गुणवत्तापूर्ण चौकशी करून वेळेत अहवाल सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. भ्रष्टाचाराशी संबंधित प्रकरणांमध्ये नियमबद्ध व ठोस कार्यवाही करण्यावर भर देत, प्रत्येक तक्रारीचा गांभीर्याने विचार करून विहित मुदतीत निपटारा करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. सर्वसामान्य नागरिकांना पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त व लोकाभिमुख सेवा उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असून, यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# मनपा स्वीकृत सदस्यांच्या निवडीचा फैसला ३० मार्च रोजी

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिकेतील स्वीकृत सदस्य निवडीच्या प्रक्रियेने आता वेग घेतला असून, दि. २५ रोजी विविध राजकीय पक्षांनी आपल्या संभाव्य उमेदवारांची नावे प्रशासनाकडे सुपूर्द केली आहेत. येत्या दि. ३० मार्च रोजी होणाऱ्या विशेष महासभेत या नावांची अधिकृत घोषणा होणार असल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.**

जळगाव महापालिकेत स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी काऊंटडाऊन सुरू असून यात विशेष म्हणजे शिवसेना ठाकरे गटाला एकच जागा असताना मात्र २ प्रस्ताव दाखल झाले आहे. भाजपकडून जेष्ठांना, तर शिंदे सेनेकडून तरुणांना आणि उबाठाच्या गटनेत्यांकडून महिलेला संधी देण्यात आली आहे. मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्याकडे विविध गटांनी आपले सर्व प्रस्ताव दिले. यामध्ये भाजपकडून डॉ. राधेश्याम चौधरी, राहुल वाघ, रमेश मतानी, सुभाष शौचे, प्रदीप रोटे तर शिवसेना (शिंदे गट) हर्षल मावळे, उद्योजक नरेंद्र सोनवणे यांना संधी मिळाली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) या गटात दोन वेगळी नावे समोर आल्याने पेच निर्माण झाला आहे. गटनेते इब्राहिम पटेल यांनी युगंधरा अमित साळुंखे यांचे नाव सुचवले आहे, तर जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील यांनी शरद तायडे यांचा प्रस्ताव बाळासाहेब कंखरे व उमेश चौधरी यांच्यामार्फत सादर केला आहे. सादर केलेल्या सर्व प्रस्तावांची कायदेशीर छाननी दि.२७ मार्च रोजी आयुक्तांच्या दालनात पार पडणार आहे. यामध्ये उमेदवारांची पात्रता आणि तांत्रिक बाबी तपासून पात्र नावांची यादी अंतिम केली जाईल. त्यानंतर ३० मार्चच्या विशेष सभेत यावर शिक्कामोर्तब होईल. आज प्रस्ताव सादर करताना महापालिकेत राजकीय हालचालींना उधाण आले होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांचे फिजिओथेरपी शिबीर उत्साहात

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील गटसाधन केंद्र शिक्षण विभाग पंचायत समिती पाचोरातर्फे समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी थेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीर फिजिओथेरपीस्ट डॉ.चेतन पाटील यांच्या हेल्थ पॉईंट फिजिओथेरपी धन्वंतरी क्लिनिक अँड रिहॅब सेंटर पाचोरा येथे घेण्यात आले. फिजिओथेरपी शिबिराचे उद्घाटन पाचोरा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी डॉ.चेतन पाटील, फिजियोथेरेपिस्ट डॉ. राहुल पाटील व त्यांची टिम, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. केंद्रस्तरीय सर्व विशेष शिक्षकांनी




संपूर्ण शिबीराचे नियोजन केले. विशेष शिक्षक लहू पवार यांनी प्रास्ताविक केले. शिबिरासाठी तालुक्यातील सर्व केंद्रातील विविध शाळांमधील जवळपास ४५ विद्यार्थी पालकांसह उपस्थित होते. डॉ.चेतन पाटील यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना फिजिओथेरपी सेवा देण्यात आली. तसेच पालकांना थेरपी, इतर वर्तन समस्या व उपाययोजना यावर मार्गदर्शन केले. गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकून राहण्यासाठी आवश्यक सहकार्य शिक्षण विभागातर्फे करीत असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष शिक्षक प्रकाश पाटील, लहू पवार, रावसाहेब साळुंखे, दिलीप पाटील, घन: शाम चौधरी, सुवर्णा पाटील, संगीता देसले, कैलास बडगुजर, सीमा पाटील, प्रज्ञा आराध्ये, जयदिप पाटील, सोनाली शेवरे यांनी कामकाज पाहिले. आभार सीमा पाटील यांनी मानले.

# पक्ष ध्येयधोरणे सामान्य माणसांपर्यंत पोहोचवा

## पाचोरा भाजपातर्फे पं.दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान उद्घाटनप्रसंगी डॉ. राधेश्याम चौधरी यांचे आवाहन

प्रतिनिधी । पाचोरा

**भाजपा सरकारने भारतीय जनतेसाठी केलेला विकास आणि देशाची झालेली प्रगती सामान्य जनतेपर्यंत पोहोचवत असताना पक्षाची ध्येयधोरणे देखील सामान्य माणसापर्यंत पोहोचावी यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत, असे आवाहन जळगाव जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी यांनी केले.**

भाजपा पाचोरा शहर मंडलतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान-२०२६ च्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. या महाप्रशिक्षण अभियानाचे उद्घाटन माजी आमदार दिलीप वाघ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा महिला मोर्चाच्या सरचिटणीस मायाताई चौधरी होत्या. प्रास्ताविक दीपक माने व सूत्रसंचालन प्रा.माणिक पाटील यांनी केले. यावेळी पाचोरा भाजपा तालुका अध्यक्ष अमोल शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष मधु काटे, व्यापारी जिल्हा सहकार आघाडी अध्यक्ष सतीश शिंदे, महिला मोर्चा जिल्हा चिटणीस मायाताई चौधरी, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष रमेश वाणी,





संजय वाघ, बन्सी पाटील, प्रा.भागवत मालपुरे, अनिल पाटील, अजय अहिरे, जगदीश पाटील, समाधान मुळे, पाचोरा नगरपालिकेचे गटनेते सुरज वाघ, टिपू देशमुख, नगरसेवक राहुल गायकवाड, ज्योती भामरे, सुशांत जाधव, सरला पाटील, डॉ निकिता झांझोटे, डॉ सुनीता मांडोळे, सुनील मोरे, रोहन मिश्रा, योगेश ठाकूर, सतीश देशमुख, उमेश माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी दिलीप वाघ यांनी भाजपा शासन सामान्य माणसासाठी कटिबद्ध असून प्रत्येक कार्यकर्त्याने पक्ष आणि पक्षनीती यांना अग्रक्रम देऊन पक्षाला सर्वश्रेष्ठ स्थान द्यावे, असे मनोगत व्यक्त केले. या दोन दिवसीय प्रशिक्षण अभियानात कालच्या प्रथम सत्राला रमेश वाणी हे अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख मार्गदर्शक असलेले पोपटतात्या भोळे यांनी मार्गदर्शन करताना पंडित दीनदयाळ उपाध्याय, शामाप्रसाद मुखर्जी यांच्यापासून ते आताचे पक्षाध्यक्ष नितीन नबीन यांच्यापर्यंत पक्षाचा इतिहास मांडला. स्व.माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्ष मजबुत करण्यासाठी अथक परिश्रम घेतल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात अध्यक्षस्थानी सदाशिव आबा पाटील तर प्रमुख मार्गदर्शक डॉ. राधेश्याम चौधरी यांनी पक्षाच्या वैचारिक अधिष्ठान यावर आपले मनोगत व्यक्त केले. गणेश झांजोटे हे अध्यक्ष गोपाल भंगाळे यांनी बूथरचना व पक्षाचा विस्तार याविषयी मार्गदर्शन केले. चौथ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी सरलाताई पाटील होत्या. प्रमुख मार्गदर्शक राजेंद्र सोनवणे यांनी सोशल मीडियाचा वापर व एआय यावरती मार्गदर्शन केले. आभार जगदीश पाटील यांनी मानले.

# ‘जय श्रीराम’च्या घोषणांनी पंकज विद्यालय दुमदुमले

## श्रीराम नवमीनिमित्त विद्यालयात अवतरले ‘प्रभू श्रीराम’

प्रतिनिधी । चोपडा

**श्रीराम जन्मोत्सव निमित्ताने पंकज प्राथमिक विद्यालयात भक्ती, संस्कार आणि उत्साह यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. संपूर्ण विद्यालय परिसर ङ्गङ्घजय श्री रामम’च्या घोषणांनी दुमदुमून गेला आणि वातावरण राममय झाले. कार्यक्रमाची सुरुवात भव्य शोभायात्रेने झाली. विद्यार्थ्यांनी वनवासी व पारंपारिक वेशभूषेत सहभागी होत प्रभू श्रीरामांच्या जीवनातील प्रसंग जिवंत केले. मोक्ष जैस्वाल (राम), भाग्येश वाघ (लक्ष्मण), लावण्या पाटील (सीता) आणि लक्ष मराठे (हनुमान) यांच्या भूमिकांनी उपस्थितांची मने जिंकली.**



यानंतर प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन संचालक नारायण बोरोले व उपशिक्षक चंद्रकांत जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. दीपप्रज्वलन आणि पूजनाने कार्यक्रमाला भक्तिमय सुरुवात झाली. डी. एम. जैस्वाल यांनी साकारलेले श्री राम गुण दर्शक फलक विशेष आकर्षण ठरले. या फलकांमधून प्रभू श्रीरामांचे आदर्श, सत्यनिष्ठा, धर्मपालन आणि कर्तव्यपरायणता यांचे प्रभावी दर्शन घडले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कारांची सुंदर छाप उमटली. जयश्री पाटील यांनी सादर केलेल्या रामरक्षा स्तोत्र पठणाने वातावरण अधिक भक्तिमय झाले, तर तेजस सोनवणे यांनी प्रभू श्रीरामांच्या जीवनाविषयी माहिती देत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत नृत्य आणि भजनाने कार्यक्रमात रंगत भरली. लहानग्यांनी साकारलेल्या श्रीरामाच्या पारंपारिक वेशभूषेने सर्वांच्या मनात भक्ती आणि अभिमानाची भावना निर्माण केली. संपूर्ण कार्यक्रमात आनंद, भक्ती आणि सांस्कृतिक एकात्मतेचे दर्शन घडले. विद्यालयातील अनिल पाटील यांनी विद्यार्थ्यांना श्रीरामांच्या आदर्शांचे पालन करण्याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक एम. व्ही. पाटील, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी प्रभावीपणे केले. तसेच कैलास बोरसे, किशोर पाटील, रविंद्र शार्दुल, दिलीप बाविस्कर आणि प्रमोद पाटील यांचे सहकार्य लाभले. अशा या उत्साहपूर्ण आणि संस्कारमय कार्यक्रमामुळे पंकज विद्यालयात खऱ्या अर्थाने रामराज्याचा आनंद अनुभवाला मिळाला .

# चोपडा पालिकेकडून थकीत घरपट्टी, पाणीपट्टी वसुलीसाठी जप्तीची कारवाई

प्रतिनिधी । चोपडा

**नगरपरिषद प्रशासनाने थकीत घरपट्टी आणि पाणीपट्टी वसुलीसाठी आता कडक पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. शहरातील बारी वाडा, पाटील गढी, चुनार अळी आणि मल्हारपुरा यांसारख्या प्रमुख भागांमध्ये धडक मोहीम राबवत तब्बल ३० नळ कनेक्शन खंडित करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत.**




### गाळ्यांवर सीलची कारवाई

केवळ नळ कनेक्शनच नव्हे, तर व्यावसायिक मालमत्तांवरही प्रशासनाने कडक कारवाई केली आहे. लायब्ररी शॉपिंग सेंटर आणि छत्रपती शाहू महाराज शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील एकूण १० गाळे सील करण्यात आले आहेत. ज्या थकबाकीदारांनी एक दिवसाची मुदत मागितली, त्यांना शेवटची संधी म्हणून वेळ देण्यात आला आहे.

कारवाईत सहभागी अधिकारी: या धडक मोहिमेत उपमुख्याधिकारी संजय मिसर, वरिष्ठ लिपिक अनिल चौधरी, लिपिक चेतन त्रिभुवन, मिळकत व्यवस्थापक महेश जोशी, लिपिक पंकज बाविस्कर, शिपाई गुलाबवाडे आणि मदतनीस मनोहर माळी यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला.पैसे उसनवारीने घेऊन भरा, पण ही संधी सोडू नका! ‘अभय योजनेचा लाभ घेतलेल्या जागरूक नागरिकांनी या योजनेचे स्वागत केले आहे. एका लाभार्थ्याने सांगितले की, ‘बँकेतून पैसे काढून किंवा उसनवारीने पैसे घेऊन घरपट्टी भरली, तरी ते फायद्याचे ठरत आहे. कारण व्याज आणि दंडात १००% सूट मिळत असल्याने मूळ रक्कमेत मोठी बचत होत आहे. अशी सुवर्णसंधी पुन्हा मिळणार नाही.

**सुटीच्या दिवशीही सेवा सुरू:** जास्तीत जास्त नागरिकांना लाभ घेता यावा यासाठी सार्वजनिक सुटीच्या दिवशीही नगर परिषदेचा वसुली विभाग कर भरणा स्वीकारण्यासाठी ३१ मार्चपर्यंत सुरू ठेवण्यात आला आहे.

### • मुख्याधिकाऱ्यांचे आवाहन

**मुख्याधिकारी यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की: अभय योजनेची अधिकृत मुदत संपलेली असूनही, नागरिकांच्या फायद्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न करून ही संधी उपलब्ध करून दिली आहे. एप्रिल आणि मे महिन्यात थकबाकीदारांवर यापेक्षा मोठी आणि कठोर कारवाई केली जाईल, आणि तेव्हा कोणत्याही प्रकारची सूट मिळणार नाही. त्यामुळे कारवाई टाळण्यासाठी त्वरित कर भरणा करावा.**

## थोडक्यात

### सुनसगाव येथे कीर्तन सप्ताहास सुरुवात

**सुनसगाव ।** येथे सालाबादप्रमाणे यंदाही श्री हनुमान जयंतीनिमित्त दि.२६ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत श्री हनुमान मंदिर प्रांगणात सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात आज २६ रोजी हभप रमेश महाराज सुनसगाव, २७ रोजी हभप मनोज महाराज दुसखेडा, २८ रोजी हभप संजय महाराज चितोडा, २९ रोजी हभप उषाताई महाराज जळगाव, ३० रोजी हभप सुधाकर महाराज बेलव्हाळ, ३१ रोजी हभप सुरेश महाराज तळवेल, १ रोजी डालेंद्र महाराज आसोदा तर २ रोजी हभप निवृत्ती महाराज शिरसोलीकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

# श्रीक्षेत्र मनुदेवी येथे नवचंडी महायज्ञाचे आयोजन

प्रतिनिधी यावल

**सातपुडा निवासिनी श्रीक्षेत्र मनुदेवी येथे नवचंडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेल्या श्रीक्षेत्र मनुदेवी येथे चैत्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची मालिका सुरू असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.**

सातपुडा निवासिनी श्रीक्षेत्र मनुदेवी येथे नवचंडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. यावल तालुक्यातील सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेल्या प्रसिद्ध धार्मिक स्थळ असलेल्या श्रीक्षेत्र मनुदेवी येथे चैत्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची मालिका सुरू आहे. या उत्सवानिमित्त आज दि. २६ मार्च रोजी



नवचंडी महायज्ञाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. चैत्र नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मनुदेवी मंदिरात दरवर्षी विविध धार्मिक विधी पार पाडले जातात. यंदाही १९ मार्च रोजी घटस्थापनेने उत्सवाला प्रारंभ झाला, दररोज पूजाअर्चा, आरती आणि धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत. अष्टमी निमित्ताने २६ मार्च रोजी नवचंडी महायज्ञ आयोजित करण्यात आला आहे.

### चोपडा आगारातून आजपासून नांदुरी गडासाठी जादा बसेस

प्रतिनिधी । चोपडा

नांदुरीगड येथे सप्तशृंगी मातेच्या यात्रोत्सवासाठी गडावर जाणाऱ्या भाविकांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या चोपडा आगारातून दि.२७ मार्च ते ३ एप्रिलदरम्यान जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. तसेच ज्या ठिकाणाहुन पुरेसे प्रवाशी असतील त्या ठिकाणाहुन जादा बसेस उपलब्ध करुन देण्यात येतील. चोपडा ते नांदुरीगड प्रौढ, फुल भाडे ३७३ हाफ भाडे १८७ एवढे आहे. चोपडा आगारातर्फे सोडण्यात येणाऱ्या जादा बसेसचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आगार प्रमुख महेंद्र पाटील यांनी चोपडा तालुक्यातील भाविक भक्तांना केले आहे.

# नांदेड येथे वामन महाराजांचा जन्मोत्सव उत्साहात

## मनोकामना पूर्ण होण्यासाठी भाविक होतात नतमस्तक

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील नांदेड येथे वामन महाराज यांचा जन्मोत्सव दर वर्षीप्रमाणे यंदाही उत्साहात साजरा करण्यात आला. या समाधी मंदिराची ख्याती अशी आहे की, येथे येणारे प्रत्येक भाविक आपले मनातील भावना वामन महाराज यांच्या समाधी पुढे नतमस्तक होऊन व्यक्त करतात आणि त्यावेळी इच्छा पूर्ण होते, अशी आख्यायिका आहे.**



वामव महाराज यांचा आशिर्वाद आपल्यासाठी शुभदायक आहे. यशदायक आहे, लाभदायक आहे, म्हणूनच सैंदाणे परिवाराकडून भाविकांना आमंत्रित केले जाते. या वर्षी अन्न दानाचा कार्यक्रम वामन महाराज यांची बहिण सुमनबाई शिवदास गायकवाड (निमगव्हाण ता.चोपडा) ह.मु.कलवा (ठाणे) तसेच (वामन महाराज यांचे भाचे ॲड.संजय गायकवाड ) यांच्याकडून झाला. यात महापूजेचा मान देखील गायकवाड परिवारास देण्यात आला. या ठिकाणी संभाजीराव सैंदाणे (पिंप्राळा)संजय कदम, दिलीपराव नंन्नवरे , पितांबर नंन्नवरे , राजेंद्र सैंदाणे, वंदनाताई भालेराव, मंगलाबाई बाविस्कर, नानासाहेब मोरे, मधुकर सोनवणे , करंकाळ , सुमन मोरे, जितेंद्र मोरे, संदानशिव परीवार, गायकवाड आदी उपस्थित होते.

### बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्यांवर गुन्हे नोंदवा

**मलकापूर ।** न.प.च्या पाणीपुरवठा जल शुध्दीकरण विभागाच्या परिसरातील बेकायदेशीररित्या झाडांची कत्तल करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे, यासाठी भिम गर्जनाचे संस्थापक अध्यक्ष भिवा चोपडे यांनी आज दि.१७ मार्च रोजी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. मात्र मुख्याधिकारी यांनी संबंधितांवर आजच गुन्हे दाखल करण्याचे आश्वासन दिल्याने सदर उपोषण मागे घेण्यात आले. हिरव्या असलेल्या झाडांची ८ दिवसांपूर्वी कोणतीही परवानगी नसतांना झाडे तोडून नेण्यात आली आहेत.

# पाचोरा येथे आज रोजगार मेळावा

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित गो.से. हायस्कूल (एम सी व्ही सी) येथे २७ मार्च रोजी सकाळी ठीक ८ वाजता जिल्हास्तरीय महारोजगार भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील टीम प्लस एच. आर. सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मुलाखती घेण्यात येणार आहे.**

पात्र विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त होणार आहे. अहिल्यानगर, पुणे छत्रपती संभाजीनगर परिसरातील इलेक्ट्रिकल बस बनवणारी कंपनीसह इतर तीन कंपन्यांचा या रोजगार मेळाव्यात सहभाग असेल. नियुक्त होणाऱ्या विद्यार्थ्यास १७ हजार ते १९ हजारपर्यंत स्टायपेंड मिळणार आहे. कॅन्टीन, बस सुविधा, इन्शुरन्ससह कंपनीचे इतर लाभ मिळणार आहेत. मुलाखती करिता येताना मार्कशीट, प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स, तीन पासपोर्ट फोटो बँक खाते पुस्तक झेरॉक्स, किंवा कॅन्सल चेक आवश्यक आहे. किमान कौशल्य विभागातील कोणत्याही ट्रेडचा पास विद्यार्थी, आय.टी.आय. कोणताही ट्रेड पास विद्यार्थी, डिप्लोमा, इंजीनियरिंगचा विद्यार्थी ज्याचे वय वर्ष १८ ते ३५ याकरिता पात्र असेल. महा रोजगार मेळाव्याचे उद्घाटन माजी आमदार दिलीप वाघ, संजय वाघ, ॲड. महेश एस. देशमुख, व्हि.टी. जोशी, देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.

# चोपडा अभियांत्रिकी महाविद्यालयात अविष्कार -२६ जल्लोषात

प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित, श्रीमती शरच्चंद्रिका सुरेश पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (इंजिनिअरिंग पॉलिटेक्निक) महाविद्यालयात अविष्कार २०२६ हा सांस्कृतिक महोत्सव नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**





कार्यक्रमाची सुरुवात ढोल-ताशांच्या गजरात भव्य शोभायात्रेने झाली. ज्यामुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. या महोत्सवात ट्रॅडिशनल डे, मिस-मॅच डे, रॅम्प वॉक, बॉलीवूड डे, रांगोळी स्पर्धा, गीतगायन, वन मिनिट शो, ड्रामा, डान्स आणि मिमिक्री अशा विविध आकर्षक स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. आपल्या उत्कृष्ट कलागुणांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव डॉ. स्मिता संदीप पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच बक्षीस वितरण समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.गौरव महाले उपस्थित होते.

# शिक्षकाच्या स्मृती जपण्यासाठी परिवाराने अस्थीच्या राखेत लावले आंब्याचे रोपटे

## अस्थीची राख नदीत टाकून पाणी दूषित करण्यापेक्षा त्यात वृक्ष लागवडीचा पायंडा पाडला

प्रतिनिधी । चोपडा

**येथील रहिवासी सेवानिवृत्त आदर्श मुख्याध्यापक ह.भ.प. तुकाराम सदा माळी (बोरसे) यांचे नुकतेच वयाच्या ९० वर्षे वृध्दापकाळाने अगदी चालता बोलता निधन झाले. परिवाराने अस्थी सारवून त्यांची अस्थी नदीत टाकून ती प्रदूषित न करता ती अस्थी शेतात टाकत ज्या ठिकाणी दोन आंब्याचे व एक नारळाचे रोपटे लावत त्यांनी वडिलांच्या स्मृती जागवल्या.**



या माळी बोरसे परिवाराचा स्तुत्य आदर्श हेतूचे सर्वत्र कौतुक होत आहे. येथील माळी परिवारातील स्व. तुकाराम माळी यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. १०० वर्षापर्यंत जगतील, अशी कुटुंबातील सदस्यांना वाटत असतानाच ते अचानक गेले. त्यांनी आपले अर्धापेक्षा जास्त आयुष्य शिक्षक म्हणून आदर्श सेवा करत हजारों विद्यार्थी घडविण्याचे महान कार्य केले. सोबतच आपल्या कुटुंबाला संस्काराचे शिक्षण देत कुटुंब पुढे आणत मोठे करून स्वतःच्या पायांवर उभे केले आणि मुले देखील सामाजिक शैक्षणिक, व्यावसायिक आदी वेगवेगळ्या क्षेत्रात अग्रेसर असून आपल्या कामाचा ठसा उमटवत आहेत. या कुटुंबाने समाजात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. ज्या वडिलांच्या प्रेरणेने हे कुटुंब पुढे आले. त्या वडिलांची स्मृती जपण्यासाठी त्यांनी अस्थी नदीसह आदी ठिकाणी विसर्जन करून ती प्रदुषित न करता त्यांच्या मुले इंजिनिअर रामकृष्ण, जयवंत, संजय महाजन यांनी अस्थीरक्षा शेतात टाकून या आंब्याची रोपे लावली.

# अजितदादा पवार स्मृतिप्रीत्यर्थ

## उद्या ‘रन फॉर रॅली’चे आयोजन

प्रतिनिधी । चोपडा

**शहरात अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ङ्गरन फॉर अजितदादाफया सद्भावना रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, ही रॅली शनिवारी (दि. २८) सकाळी ८ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरू होणार आहे.**

रॅलीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू होऊन श्री गाडगेबाबा चौक, थाळनेर दरवाजा, राणी लक्ष्मीबाई चौक, मेन रोड, आझाद चौक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे पुन्हा शिवाजी महाराज चौक येथे येऊन समारोप होणार आहे. शहरातील प्रमुख मार्गांवरून धावणारी ही रॅली ऐक्य, सद्भावना व सामाजिक एकजुटीचा संदेश देणार आहे. या उपक्रमात युवक, नागरिक व विविध सामाजिक संघटनांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य सुनिल पाटील (वाळकीकर) यांनी केले आहे. या रॅलीमुळे शहरात उत्साहाचे वातावरण दृढ होणार आहे.

# मारवड महाविद्यालयात कमवा-शिकवाचे धनादेश वितरित

प्रतिनिधी । अमळनेर

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या विद्यार्थी विकास विभाग व मारवड येथील ग्रामविकास शिक्षण मंडळ संचालित कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, महाविद्यालयात प्रवेशीत आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत म्हणून, कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना दरवर्षी राबविण्यात येते.**

याअंतर्गत विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना ऑफ तासिकांच्या वेळी महाविद्यालयातच विविध प्रकारची कामे करत असतात. त्या मोबदल्यात त्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये अशा ३ विद्यार्थीनींना या योजनेंतर्गत



ग्रामविकास शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष आबासो, देविदास शामराव साळुंखे तसेच संचालक भैय्यासाहेब दिनेश वासुदेव साळुंखे, दादासाहेब मनोज हिंमतराव साळुंखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत देसले यांच्या हस्ते धनादेशाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.व्ही.डी.पाटील, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे माजी जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. पवन पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी प्रो. डॉ. जितेंद्र माळी. भाऊसो. सचिन पाटील व मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थीनी, सर्व प्राध्यापक वृंद व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.